पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,

Website – pcmcindia.gov.in

E-mail – account@pcmcindia.gov.in

जावक क्र.लेखा/ ११ /कावि/ ०२/२०२४ दिनांक :- २३/०४/२०२४

## परिपत्रक

विषय:- मनपा अधिकारी/ कर्मचारी/वस्तु व सेवा पुरवठादार / कंत्राटदार/ ठेकेदार/ मानधन कर्मचारी, इत्यादी यांचे लेखा संगणक प्रणालीमधील ई.सी.एस नोंदणीकरणाबाबत.

लेखा विभागामध्ये मनपाच्या सर्व मनपा अधिकारी/ कर्मचारी/वस्तु व सेवा पुरवठादार / कंत्राटदार/ ठेकेदार/ मानधन कर्मचारी, इत्यादी यांचे लेखा संगणक प्रणालीमधील ई.सी.एस ( Electronic Clearance service ) माहितीचे नोंदणीकरण केले जाते. सद्यस्थितीत वस्तु व सेवा पुरवठादार / कंत्राटदार/ठेकेदार यांची लेखा संगणक प्रणालीमधील नविन ई.सी.एस माहितीची नोंदणी अथवा दुरूस्ती करावयाची असल्यास त्यांचेकडून ई.सी.एस फॉर्म नमूना भरून त्यावर संबंधित बॅकेच्या शाखा अधिकारी यांचे कडून बॅक व्हेरीफीकेशन करून ई.सी.एस फॉर्म पॅन कार्ड, जी.एस.टी प्रमाणपत्र व कॅंसल चेक / बॅक स्टेटमेंट सह सदर करण्यात येते. अशा प्रकारचे अर्ज स्विकारून लेखा विभागामार्फत ई.सी.एस नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. परंतु मागील काही कालावधीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, काही वस्तु व सेवा पुरवठादार / कंत्राटदार / ठेकेदार त्यांचे सोयीनुसार वारंवार त्याचे बॅक खात्याच्या माहितीमध्ये बदल करणेकामी अर्ज सादर करीत आहेत त्यामुळे सदर प्रक्रियेमध्ये संबंधित विभागाचा अंर्तभाव / समावेश अथवा नियंत्रण नसल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बाब ही आर्थिक औचित्य व शिस्तीच्या दृष्टीने योग्य नाही. त्यामुळे आर्थिक कामकाजामध्ये सुसुत्रता आणणेसाठी, ई.सी.एस माहिती नोंदणीवर नियंत्रण ठेवणेसाठी व आर्थिक शिस्त ठेवणेकरीता सदर कार्यपध्दतीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

सबब, ई.सी.एस माहिती नोंदणीचे कामामध्ये सुसुत्रता, नियंत्रण व आर्थिक शिस्तीकरीता यापुढे वस्तु व सेवा पुरवठादार / कंत्राटदार/ठेकेदार तसेच सर्व प्रकारचे ई.सी.एस माहितीची नोंदणी व दुरूस्ती संबंधीत विभागाने जबाबदारीने करावी व सदर कामकाजावर संबंधित विभागप्रमुखांनी कटाक्षाने नियंत्रण ठेवावे. सदर परिपत्रक सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे व सदर परिपत्रकाची सर्व विभागप्रमुखांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची गंभीरतेने दखल घ्यावी.

Pravin Jain

( प्रवीण जैन )

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी

प्रति,

सर्व संबंधित विभाग

जोडपत्र - अ

## ई सी एस / एन ई एफ टी द्वारे प्रदाने प्राप्त करण्यासाठीचा तपशिल

१ मागणीदार /पुरवठादार /कंत्राटदारचे नाव / फर्मचे नाव

२ कार्यालयाचे नाव व पत्ता (ज्या प्रकरणी लागू आहे)

३ बँक खाते क्रमांक

४ बँक खात्याचा प्रकार

५ बँकेचे नाव

६ बँक शाखेचे नाव व पत्ता

७ बँक शाखेचा संकेतांक

८ एम आय सी आर क्रमांक

९ आय एफ एस सी संकेतांक

दिनांक

कंत्राटदार / पुरवठादार / मागणीदाराची सही

### बँकेचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील माहिती मी तपासून पाहीली असून ती योग्य आहे.

शाखा प्रमुख

-------------------- (बँक शाखेचे नाव व शिक्का)

(1) PAN CARD
(2) CANCEL CHEQUE
(3) GST CERTIFICATE